**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2019 = 6.380, www.srjis.com*
*PEER REVIEWED & REFEREED JOURNAL, JAN-FEB, 2020, VOL- 7/57*

# समुपदेशन प्रशिक्षणाची आवश्यकता:आजीवन अध्ययन विशेष संदर्भ समुपदेशनसाठी असरकारी संस्थांमधील व्यावसायिक समाजकार्यकर्त्यांला

**श्रीमती सुनिता काशिनाथ जगताप[1] & प्रा. विश्वनाथ गुप्ता[2], Ph. D.**
*[1] संशोधक, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,पुणे.*
*[2] आजीवन अध्ययन व विस्तार विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,पुणे.*

***Scholarly ResearchJournal's* is licensed Based on a work at *www.srjis.com***

**प्रस्तावना**

मानवी समाज वेगवेगळ्या सामाजिक समस्यांना तोंड देत आहे. तसेच ऐतिहासिक आढावा घेतल्यास असे लक्षात येते की काळानुरूप सामाजिक परिस्थिती बदलत गेली व त्यानुसार समाजकार्य बदलत गेले. आज व्यावसायिक समाजकार्याचे स्वरूप, कल्याणकारी, विकसकीय, परिस्थितीजन्य झाले आहे तसेच आजचा समाज नवउदारमतवाद, आधुनिकवाद यासारख्या विचारांनी मुक्त अर्थव्यवस्थेच्या खाजगीकरण व जागतिकीकरणाने प्रभावित आहे. सद्यकालीन समाजात पुरोगामी समाजकार्य व विकासात्मक समाजकार्य महत्त्वाचे आहे. समाजकार्याच्या क्षेत्रातील सर्वांनीच व्यक्तीसहयोगकार्य, गटकार्य, समुदाय संघटन, समाजकल्याण प्रशासन, सामाजिक संशोधन व सामाजिक कृती ही समाजकार्याची महत्त्वाची अंगे आहे. ऐच्छिक समाजकार्य जेव्हा व्यवसायात रूपांतरित होते तेव्हा त्यास व्यावसायिक समाजकार्य म्हटले जाते. व्यवसायिक समाजकार्यात विशिष्ट बंधने, तत्वे व पद्धतीबरोबरच नीतिमत्तेचे पालन केले जाते. म्हणून व्यावसायिक समाजकार्यकर्त्याला विविध प्रकारच्या प्रशिक्षण देण्याची आवश्यकता असते. प्रशिक्षित व्यक्तीला व्यावसायिक कुशलता प्राप्त होते, तसेच त्याच्या निर्णयास सहसा कोणी आव्हान करत नाही, त्याचा सल्ला नाकरत नाही, कारण समस्याग्रस्त व्यक्तीला त्याच्यामुळे एक प्रभावी सुरक्षितता प्राप्त होते. मानसिक आधार मिळतो. व्यक्तीसहाय्यकार्य, गटकार्य, समुदाय संघटन, सामाजिक संशोधन, सामाजिक प्रशासन व सामाजिक कृती आदी विषयांच्या सामाजिक जाणिवेतून व्यावसायिक समाजकार्यकर्ता तयार होतो. आणि समस्याग्रस्त व्यक्ती, गट व समुदायाच्या समस्या सोडवण्यास सक्षम बनतो. व्यावसायिक समाजकार्यकर्त्या सरकारी, असरकारी, निमशासकीय व खाजगी संस्थांमध्ये कार्यरत असतो. हे कार्य तो आदिवासी, शहरी, ग्रामीण समुदाय सोबत करतो व असरकारी

संस्थांमध्ये जेव्हा समाजकार्यकर्ता काम करतो, तेव्हा त्या क्षेत्रात कार्य करत असतांना तेथे चिरस्थायी विकास झाला पाहिजे असा उद्देश ठेवून त्यांनी कार्य करत राहणे गरजेचे असते. समाजकार्याचे विविध क्षेत्रतील एक  क्षेत्र म्हणजे समुपदेशन होय. समुपदेशनाचे विविध प्रकार आहे ते म्हणजे:विवाह आणि कुटुंब समुपदेशन, शैक्षणिक समुपदेशन, पुनर्वसन समुपदेशन, मानसिक आरोग्य समुपदेशन, प्रतिबंधात्मक समुपदेशन, विकासात्मक समुपदेशन आणि थेरपी (डीसीटी) आहे. समुपदेशकांचे सामान्यतः पुढील प्रकार पडतात-विवाह आणि कौटुंबिक समुपदेशन, मार्गदर्शन आणि कारकीर्द सल्ला, पुनर्वसन समुपदेशन, मानसिक आरोग्य सल्ला, पदार्थ दुरुपयोग समुपदेशन, शैक्षणिक समुपदेशन, सुविधायुक्त समुपदेशन. सायकोडायनामिक, मानवतावादी आणि वर्तणूक हे समुपदेशनाचे तीन मुख्य दृष्टीकोन आहेत.

समुपदेशनाचे यश हे मानसोपचारतज्ज्ञाचे कौशल्य आणि रुग्णाचे सहकार्य, अंमलबजावणी यावर अवलंबून असते. त्यात सातत्य हे फार महत्त्वाचे असते. त्याचे यश हे औषधासारखे लगेच दिसत नाही तर वेळ लागतो. व्यक्ती किती मनापासून, सातत्याने उपचारांना येत आहे तसेच तज्ज्ञ किती कौशल्याने वेगवेगळ्या पद्धती वापरून उपचार करत आहे यावर यशस्वीतता ठरत असते म्हणून असरकारी संस्थांमधील  व्यावसायिक समाजकार्यकर्त्यांला समुपदेशन प्रशिक्षणाची आवश्यकता असते.

**व्याख्या:** समुपदेशन म्हणजे लाभार्थीची समस्या सोडवण्यासाठी समुपदेशक व लाभार्थी या दोघांमध्ये मैत्रीपूर्ण वातावरण व सामंजस्याने होणारे हेतुपूर्वक संभाषण होय.

- **मानसशास्त्र:** समुपदेशन हा शब्द मानसोपचाराला समानार्थी वापरला जातो.
- **विश्वास:** समुपदेशनात आधी समोरच्या व्यक्तीशी आपुलकीचं नातं, विश्वासाचं नातं प्रस्थापित करून त्याच्या समस्येला सर्व बाजूंनी जाणून घेण्यात येतं.
- **गुप्तता:** व्यक्ती जवळ असलेली माहिती ही त्या व्यक्तीच्या संमतीशिवाय कोणालाही सांगितली जात नाही, हा गुप्ततेचा करार असतो
- **मार्ग सुचवने:** विविध उपाय वापरून त्या व्यक्तीची समस्या सोडवण्यासाठी त्या व्यक्तीला मार्ग सुचवला जातो.
- **परिणाम:** समुपदेशन ही एक मानसशास्त्रीय प्रक्रिया असून त्याचा लाभार्थी आणि समुपदेशक या दोघांच्याही मानसिकतेवर परिणाम होतो.
- **स्वताच्या समस्या स्वतः सोडवण्यास समर्थ तयार करणे:** लाभार्थी आणि समुपदेशक परस्परांच्या मानसिकतेवर परिणाम करीत असतात त्यामुळे लाभार्थीत बदल होऊन तो स्वताच्या समस्या स्वतः सोडवण्यास समर्थ होतो.

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

म्हणून असरकारी संस्थांमधील व्यावसायिक समाजकार्यकर्त्यांला समुपदेशन प्रशिक्षणाची आवश्यकता याबदलचे अध्ययन सदर अध्ययनात केले आहे.

**अध्ययनची गरज**

- वैयक्तिक व सामाजिक प्रश्न सोडवण्यासाठी विशिष्ट समुपदेशन तंत्र पद्धतीचा वापर असरकारी संस्थांमधील व्यावसायिक समाजकार्यकर्त्या करतो का हे अभ्यासणे.
- वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक प्रश्न सोडवण्यासाठी आजीवन अध्ययनाची गरज असरकारी संस्थांमधील व्यावसायिक समाजकार्यकर्त्याला आहे का हे अभ्यासणे.
- समुपदेशन क्षेत्रातील असरकारी संस्थांमधील व्यवसायिक समाजकार्यकर्त्याच्या कार्यपद्धती अभ्यासणे.

**संशोधन समस्येचे विधान**

समुपदेशनसाठी असरकारी संस्थांमधील व्यावसायिक समाजकार्यकर्त्यांला समुपदेशन प्रशिक्षणाची आवश्यकता:आजीवन अध्ययन विशेष संदर्भ

**संशोधनाचे महत्त्व**

- समाजकार्याच्या समुपदेशन क्षेत्रांची माहिती होईल.
- समाजकार्यकर्त्याच्या समुपदेशन कार्यात वेळोवेळी होणाऱ्या बदलासाठी आजीवन अध्ययनाची गरज लक्षात घेऊन कर्मचारी विकासासाठी संस्थात्मक पातळीवर प्रशिक्षण आखण्यासाठी उपयुक्त ठरेल.

**संशोधन समस्या**

तंत्रज्ञान, शिक्षणपद्धती, सामाजिक बदल, व्यवस्थापन, प्रशासन इत्यादींमध्ये सध्या कालखंडात बदल झाल्यामुळे कार्यपद्धतीत देखील बदल झालेला आहे. या साठी व्यावसायिक समाजकार्यकर्त्यांला समुपदेशन प्रशिक्षणाची आवश्यकता [आजीवन अध्ययन] आहे का हे अभ्यासले आहे.

**संशोधन पद्धती**

सदर अध्ययनासाठी सामाजिक सर्वेक्षण पद्धतीचा वापर करणार आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

१) असरकारी संस्थांमधील व्यावसायिक समाजकार्यकर्त्याच्या समुपदेशन प्रशिक्षणाची आवश्यकता [आजीवन अध्ययन] आहे का हे अभ्यासणे.

२) असरकारी संस्थांमधील व्यावसायिक समाजकार्यकर्त्याच्या समुपदेशन प्रशिक्षणात कोणती माहिती संपादित करतो हे अभ्यासणे.

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**संशोधन गृहितके**

१(समुपदेशनसाठी असरकारी संस्थांमधील व्यावसायिक समाजकार्यकर्त्याच्या समुपदेशन प्रशिक्षणाची आवश्यकता [आजीवन अध्ययन] आहे.

**संशोधन आराखडा**

उपलब्ध करून घेतलेल्या तथ्य द्वारे संकलित माहितीचे वर्णनात्मक विवेचन करणार आहे. एकंदरीत वर्णनात्मक संशोधन आराखडा वापरला आहे.

**नमुना निवड आराखडा**

नाशिक शहरातील असरकारी संस्थांमधील व्यावसायिक समाजकार्यकर्त्यांला समुपदेशन प्रशिक्षणाची आवश्यकता या साठी नाशिक शहरातील समुपदेशन क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या 30 व्यावसायिक समाजकार्यकर्त्यां कडून मुलाखत-अनुसूची भरून घेतली.

तथ्य संकलन व विश्लेषण

सदर विषय अभ्यासताना प्राथमिक तथ्य संकलन पद्धतीचा वापर करून मुलाखत-अनुसूची तयार केली व दुय्यम तथ्य संकलन साधनांचा वापर व्यावसायिक समाजकार्यकर्ता कडून सर्वेक्षण फॉर्म भरून घेतले आहे.

**सारणी क्रमांक 1**

**असरकारी संस्थांमधील व्यावसायिक समाजकार्यकर्त्यांला समुपदेशन प्रशिक्षणाची आवश्यकता असते का हे दर्शवणारी सारणी**

| अनु क्र | तपशील | शेकडा प्रमाण | वारंवारिता |
|---|---|---|---|
| 1 | होय | 30 | 100% |
| 2 | नाही | 00 | 000% |
| | एकूण | 30 | 100% |

असरकारी संस्थांमधील सर्व व्यावसायिक समाजकार्यकर्त्यांला समुपदेशन प्रशिक्षणाची आवश्यकता आहे. थोडक्यात व्यक्तीला समुपदेशन क्षेत्रात कार्यरत असताना सतत अध्ययनाची आवश्यकता असते.

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**सारणी क्रमांक 2**

**असरकारी संस्थांमधील व्यावसायिक समाजकार्यकर्त्यांला समुपदेशन प्रशिक्षणाची आवश्यकता असल्यास कोणत्या प्रकारचे प्रशिक्षण मिळाली पाहिजे हे दर्शवणारी सारणी**

अनु क्र तपशीलशेकडा प्रमाण वारंवारिता

| अनु क्र | तपशील | शेकडा प्रमाण | वारंवारिता |
|---|---|---|---|
| 1 | कायद्यातील वेळोवेळी होणाऱ्या बदलाबाबत प्रशिक्षण मिळावे | 30 | 100% |
| 2 | अहवाल लेखन करण्यासाठी प्रशिक्षण मिळावे | 28 | 98 % |
| 3 | संभाषण कौशल्य विकासासाठी प्रशिक्षण मिळावे | 30 | 100% |
| 4 | ताण व्यवस्थापन- स्वतःचे व अशिलाचे | 22 | 73 % |
| 5 | विविध योजना व कार्यक्रमांच्या माहितीच्या अध्ययनासाठी प्रशिक्षण मिळावे | 30 | 100% |
| 6 | नेटवर्क प्रस्थापित करण्याच्या अनुषंगाने कौशल्य विकासा साठी प्रशिक्षण मिळावे | 26 | 86.66% |
| 7 | समाजात होणाऱ्या घडामोडींची माहिती अभ्यासन्यासाठी प्रशिक्षण मिळावे | 26 | 86.66% |
| 8 | विविध प्रश्नांबाबत समुपदेशना करण्यासाठी प्रशिक्षण मिळावे | 27 | 90% |
| 9 | वेगवेगळ्या वयोगटासाठी समुपदेशन बाबत मार्गदर्शन करण्यासाठी प्रशिक्षण मिळावे | 27 | 90% |

सदर प्रश्न हो बहुपर्यायी असल्याने बहुपर्यायी ना प्रध्यान क्रम मिळाला आहे. कायद्यातील वेळोवेळी होणाऱ्या बदलाबाबत प्रशिक्षण मिळावे, संभाषण कौशल्य विकासासाठी प्रशिक्षण मिळावे, विविध योजना व कार्यक्रमांच्या माहितीच्या अध्ययनासाठी प्रशिक्षण मिळावे या साठी सर्वच समुपदेशकांनी पसंती दर्शवली तर अहवाल लेखन करण्यासाठी प्रशिक्षण मिळावेया बाबत २८ समुपदेशकांनी पसंती दर्शवली व ताण व्यवस्थापन- स्वतःचे व अशिलाचे या बाबत २२ समुपदेशकांनी पसंती असरकारी संस्थांमधील व्यावसायिक समाजकार्यकर्त्यांला समुपदेशन प्रशिक्षणाची आवश्यकता असल्यास कोणत्या प्रकारचे प्रशिक्षण मिळाली पाहिजे दर्शवली आहे.

**सारणी क्रमांक 3**

**असरकारी संस्थांमधील व्यावसायिक समाजकार्यकर्त्यांला समुपदेशन प्रक्रियातील कोणत्या टप्पात प्रशिक्षणाची आवश्यकता अधिक असते हे दर्शवणारी सारणी**

| अनु क्र | तपशील | शेकडा प्रमाण | वारंवारिता |
|---|---|---|---|
| 1 | पहिला टप्पा - लाभार्थीशी संबंध प्रस्थापित करणे. | ३0 | 100% |
| 2 | दुसरा टप्पा - समस्येचे निदान व विश्लेषण करणे | 30 | 100% |
| 3 | तिसरा टप्पा - लाभार्थित योग्य ते बदल करणे | 28 | 98 % |

Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

सदर प्रश्न हो बहुपर्यायी असल्याने बहुपर्यायी ना प्रध्यान क्रम मिळाला आहे. पहिला टप्पा - लाभार्थीशी संबंध प्रस्थापित करणे, दुसरा टप्पा - समस्येचे निदान व विश्लेषण करणे, तिसरा टप्पा - लाभार्थित योग्य ते बदल करणे या टप्पात असरकारी संस्थांमधील व्यावसायिक समाजकार्यकर्त्यांला समुपदेशन प्रक्रियातील कोण्त्या टप्पात प्रशिक्षणाची आवश्यकता अधिक असते.

**सारणी क्रमांक 4**

**समुपदेशन प्रक्रीयेतील कोणत्या नितीमुल्य अभ्यासण्यासाठी प्रशिक्षण मिळावे हे दर्शवणारी सारणी**

| अनु क्र | तपशील | शेकडा प्रमाण | वारंवारिता |
|---|---|---|---|
| 1 | गुप्तता | 30 | 100% |
| 2 | लाभार्तीत भेदाभेद न करणे | 30 | 100% |
| 3 | नैतिकतेच्या बंधनाचे पालन करणे | 28 | 98 % |
| 4 | कायमस्वरूपी मत न बनविणे | 30 | 100% |
| 5 | नोंदी ठेवणे | 30 | 100% |

सदर प्रश्न हो बहुपर्यायी असल्याने बहुपर्यायी ना प्रध्यान क्रम मिळाला आहे. गुप्तता, लाभार्तीत भेदाभेद न करणे, कायमस्वरूपी मत न बनविणे, नोंदी ठेवणे व या नैतिकतेच्या बंधनाचे पालन करणे समुपदेशन प्रक्रीयेतील नितीमुल्य अभ्यासण्यासाठी प्रशिक्षण मिळावे.

**सारणी क्रमांक 5**

**समुपदेशनातील कोणत्या सूक्ष्म कौशल्य विकसित होण्यासाठी प्रशिक्षण मिळावे हे दर्शवणारी सारणी**

| अनु क्र | तपशील | शेकडा प्रमाण | वारंवारिता |
|---|---|---|---|
| 1 | तदनुभूती,सहानुभूती | 25 | 83% |
| 2 | ऐकणे | 30 | 100% |
| 3 | माहिती देणे | 30 | 100% |
| 4 | संभाषण कौशल्य. [प्रभावी समुपदेशकांकडे उत्कृष्ट संभाषण कौशल्य असावे.] | 30 | 100% |
| 5 | सुचविणे, संबंध-निर्माण कौशल्ये. | 30 | 100% |
| 6 | काढून घेणे ,बोलते करणे | 28 | 98 % |
| 7 | आव्हान देणे,आत्म-जागरूकता. | 30 | 100% |
| 8 | आधार देणे | 30 | 100% |
| 9 | पुढे नेने [समस्या सोडविण्यासाठी] | 30 | 100% |
| 10 | स्वीकार | 30 | 100% |
| 11 | समस्या सोडवण्याचे कौशल्य | 30 | 100% |
| 12 | लवचिकता | 30 | 100% |

सदर प्रश्न हो बहुपर्यायी असल्याने बहुपर्यायीना प्रध्यान क्रम मिळाला आहे. ऐकणे, माहिती देणे, संभाषण कौशल्य, सुचविणे, संबंध-निर्माण कौशल्ये, काढून घेणे ,बोलते करणे,आव्हान देणे,आत्म-जागरूकता, आधार देणे, पुढे नेने [समस्या सोडविण्यासाठी],स्वीकार,समस्या सोडवण्याचे कौशल्य, लवचिकता या समुपदेशनातील सूक्ष्म कौशल्य विकसित होण्यासाठी प्रशिक्षण मिळावे तर तदनुभूती,सहानुभूती या समुपदेशनातील सूक्ष्म कौशल्य विकसित होण्यासाठी प्रशिक्षण मिळावे या बाबत कमी प्रतिसाद मिळाला.

**सारणी क्रमांक 6**

**समुपदेशनातील कोणत्या वैशिष्ट्ये विकसित होण्यासाठी प्रशिक्षण मिळावे हे दर्शवणारी सारणी**

अनु क्र तपशीलशेकडा प्रमाण वारंवारिता

| अनु क्र | तपशील | शेकडा प्रमाण | वारंवारिता |
|---|---|---|---|
| 1 | लवचिकता | 29 | 96.6% |
| 2 | अनुभव | 30 | 100% |
| 3 | प्रामाणिकपणा | 30 | 100% |
| 4 | आदर | 20 | 66.6% |
| 5 | निष्ठा | 28 | 93% |
| 6 | आत्मविश्वास | 30 | 100% |
| 7 | सल्लागार | 30 | 100% |
| 8 | लक्ष | 30 | 100% |
| 9 | जवळीक | 27 | 90% |
| 10 | उबदार | 20 | 66.6% |
| 11 | मोकळेपणा | 26 | 86.6% |

सदर प्रश्न हो बहुपर्यायी असल्याने बहुपर्यायीना प्रध्यान क्रम मिळाला आहे. लवचिकता, अनुभव ,प्रामाणिकपणा, निष्ठा, आत्मविश्वास, सल्लागार, लक्ष, जवळीक, मोकळेपणा या समुपदेशनातील मुद्द्यावर वैशिष्ट्ये विकसित होण्यासाठी प्रशिक्षण मिळावे या बाबत अधिक प्रतिसाद मिळाला तर उबदार,आदर या समुपदेशनातील मुद्द्यावर वैशिष्ट्ये विकसित होण्यासाठी बाबत कमी प्रतिसाद मिळाला. या बाबत अभ्यास केल्या नंतर असे लक्षात आले कि या मुद्द्याबाबत समुपदेशकाकडे स्पष्टता नाही.

**गृहित कृत्यांची पडताळणी**

वरील सारणी क्रमांक १ ते ६ वरून हे लक्षात येते कि समुपदेशनसाठी असरकारी संस्थांमधील व्यावसायिक समाजकार्यकर्त्याच्या समुपदेशन प्रशिक्षणाची आवश्यकता [आजीवन अध्ययन] आहे. थोडक्यात समुपदेशन क्षेत्रात कार्यरत असताना व्यावसायिक समाजकार्यकर्त्याला सामाजिक प्रश्नबाबत माहिती करून घेण्यासाठी सतत नवनवीन माहिती आवश्यकता असते म्हणून आजीवन अध्ययन करत

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

राहणे गरजेचे आहे. तसेच समुपदेशन प्रक्रियातील कोणत्या टप्पात प्रशिक्षण मिळावे , कोणत्या कौशल्य विकसित होण्यासाठी प्रशिक्षण मिळावे, समुपदेशनातील कोणत्या वैशिष्ट्ये विकसित होण्यासाठी प्रशिक्षण मिळावे या बाबत समुपदेशकाचे मुद्दे लक्षात आले.

**उपाययोजना**

१] असरकारी संस्थांमधील व्यावसायिक समाजकार्यकर्त्यांच्या समुपदेशन प्रशिक्षणाची गरज लक्षात घेता असरकारी संस्थांनी वेळोवेळी कर्मचार्यांसाठी विविध प्रशिक्षणाचे आयोजन करावे.

२] समुपदेशन क्षेत्रात कार्यरत असरकारी संस्थांमधील व्यावसायिक समाजकार्यकर्त्याने समुपदेशन प्रशिक्षण वेळोवेळी घेतले पाहिजे.

३]संवेदनशील विषय बाबत प्रशिक्षण करताना त्याबाबतची माहिती संबधीत संस्थांनी माहिती,अथवा प्रशिक्षणाचे आयोजन करावे.

## संदर्भसूची

*Gelso, C.J., Williams, E.N. & Fretz, B. (2014). Counseling Psychology (3rd ed.). Washington, D.C.: American Psychological Association.*

*Alkazi, R. M. (1992). Disability. In Mukhopadhyay, A. (Ed.), State of India's health (pp. 377-398). New Delhi: Voluntary Health Association of India.*

*Arulmani, G. (2007). Counseling psychology in India: At the confluence of two traditions. Applied Psychology, 56, 69–82*

*Balatchandirane, G. (2003). Gender discrimination in education and economic development: A study of South Korea, China and India. International Studies, 40, 349-378.*

*https://wikipedikia.org/mr/how-many-types-of-counselling-are-there-2*

*https://mr.wikipedia.org/wiki/%E0%A4%B8%E0%A4%AE%E0%A5%81%E0%A4%AA%E0%A4%A6%E0%A5%87%E0%A4%B6%E0%A4%A8*

*https://worldscholarshipforum.com/mr/%E0%A4%B8%E0%A4%AE%E0%A5%81%E0%A4%AA%E0%A4%A6%E0%A5%87%E0%A4%B6%E0%A4%A8*

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*